





दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड – महाराष्ट्र । सोमवार दि. ०४ मे २०२६ । वर्ष ६ वे । अंक ४५ । पाने ४ । पान १ । किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

















# पुण्यानंतर बीडमध्येही संतापजनक घटना

## 3 वर्षांच्या नातीवर आजोबाचा अत्याचार

**बीड । प्रतिनिधी**

पुण्यातील नसरापूरमधील अत्याचाराचे प्रकरण ताजे असतानाच बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील एका गावात ५० वर्षीय आजोबाने आपल्या ३ वर्षांच्या नातीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित चिमुकलीची आई आपल्या ३ वर्षांच्या मुलीसह माहेरी आली होती. १६ ते २५ एप्रिल या कालावधीत आरोपीने (मुलीच्या आजोबाने) संधी साधून बालिकेवर अत्याचार



**● मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीची आई आपल्या ३ वर्षांच्या मुलीसह माहेरी आली होती. १६ ते २५ एप्रिल या कालावधीत संधी साधून आरोपी आजोबाने या चिमुकलीवर दोन–तीन वेळा अत्याचार केला. घटनेनंतर मुलीला त्रास जाणवू लागल्याने तिने आईला हा प्रकार सांगितला. ही बाब समजताच आई हादरली आणि तात्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली.**

केला. नंतर मुलीला त्रास होऊ लागल्याने तिने आपल्या आईला ही घटना सांगितली. आपल्या स्वतः च्या वडिलांकडून असे घृणास्पद कृत्य झाल्याचे ऐकून आईला मोठा धक्का बसला. आजोबाने रक्ताच्या नात्याला कलंक लावल्याची माहिती कळताच परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले. आरोपीला कठोरता कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली जात आहे. पीडितेच्या आईने तातडीने युसुफवडगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्याच्या कलम ४ आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल केला. 'पिंक पथका'चे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांच्या पथकाने तात्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. आरोपीला आज न्यायालयात हजर करण्यात येणार असून, पोलिस अधिक तपास करत आहेत. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, आरोपीला कोर्टात हजर केल्यानंतर त्याची पोलीस कोठडी मागण्यात येणार आहे.

# गेवराईत विजेचा लपंडाव

**● महावितरणच्या गलथान कारभारावर तातडीने लक्ष न दिल्यास कार्यालयावर मोर्चा काढवा लागणार?**

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरात सध्या सूर्याचा पारा चाळीशी पार गेल्याने नागरिक उन्हाच्या झळांनी होरपळून निघत आहेत. अशा भीषण उन्हाळ्यात महावितरणच्या गलथान कारभारामुळे शहरात विजेचा मोठा लपंडाव सुरू असून, यामुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. या गंभीर प्रश्नावर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी महावितरणच्या कारभाराचा तीव्र निषेध व्यक्त केला असून प्रशासनाला इशारा दिला आहे.विनाकारण वीज खंडित, नागरिक त्रस्तशहरात सध्या अधिकृत लोडशेडिंग नसतानाही तासनतास वीज खंडित केली जात आहे. कडक उन्हाच्या वेळी कोणतीही पूर्वसूचना न देता वीज गायब होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींचे हाल होत आहेत. जर लोडशेडिंग नाही, तर मग वारंवार वीज ▶▶ उर्वरित पान २ वर

# पेट्रोल-डिझेलसाठी लांब रांगा...

## अनेक पंपावर 'नो स्टॉक' बोर्ड, वाहनचालकांचे हाल




**बीड । प्रतिनिधी**

बीड आणि धाराशीव जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याचे वृत्त आहे. ज्यामुळे जनजीवन आणि शेतीवर गंभीर परिणाम होत आहे. अनेक पेट्रोल पंप 'साठा नाही' अशा पाट्या लावून बंद झाले असून, त्यामुळे वाहनांच्या

**● बीड शहरातील काही भागात पेट्रोल डिझेलचा साठा करत पेट्रोल १८० तर डिझेल १५० प्रति लिटर दराने विक्री होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे पुरवठा विभागाने या घटनेचे गांभीर्य घेऊन तत्काळ अशा काळाबाजार करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्याची गरज आहे.**

लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

या तुटवड्यामुळे रहिवाशांना मोठा त्रास होत आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, जालना जिल्ह्यातील शाहगड परिसरातील अनेक पेट्रोल पंपांवर इंधन उपलब्ध नाही. अनेक पेट्रोल पंपांवर 'स्टॉक नाही' असे फलक लावण्यात आले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या तुटवड्यामुळे वाहनचालकांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. जिथे इंधन उपलब्ध आहे, तिथे पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत आहेत. धारशिव जिल्ह्यातील ▶▶ उर्वरित पान २ वर



# कृषी प्रदर्शनाला तिसऱ्या दिवशीही अलोट गर्दी

### आज पुरस्कार वितरण समारंभ : कुलगुरू इंद्रमणी, ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते होणार वितरण

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे सुरु असलेल्या पाच दिवशीय कृषी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशीही नागरिकांनी कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी अलोट गर्दी पाहायला मिळाली दिनांक ५ मे मंगळवार पर्यंत हे प्रदर्शन चालू राहणार आहे कृषी प्रदर्शनात प्रामुख्याने कृषी क्षेत्रातली विविध स्टॉल आकर्षण ठरत आहे.

किसान कृषी प्रतिष्ठाणच्या वतीने गेवराई येथे मागील १८वर्षापासून कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी प्रथमच बीड येथे खरीप हंगामाच्या तोंडावर प्रदर्शन आयोजित केले आहे या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरतील असे अनेक कंपन्यांचे स्टॉंल ला गले

**● खव्वयांना खाद्य स्टॉंलची भुरळ– या प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञान, कृषी क्षेत्रातील नवीन विचार या बरोबरच खाद्य पदार्थांचे देखील स्टॉंल आहेत. या स्टॉंलवर अल्पोपहार तसेच वडापाव, कचोरी, समोसा, अपे, पाणीपुरी, रगडा, डोसा, उथप्पा मिळत असून याठिकाणी खवय्ये मोठी गर्दी करत असल्याचे एकंदरीत चित्र आहे**

आहेत. या स्टॉंलवर तज्ञांमार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते आज दिनांक ४ मे रोजी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११ ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: पांडुरंग भस्मारे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना गिरीष देशपांडे, सतीश बहीर, दत्तात्रय दुधाळ, बाळकृष्ण शेनगुडे, संजय जाधव, अशोक टल्ले, आकाश जाधव, सुभाष सोनवणे, वसंत नहिराळे, दत्ता डाके आदि.*

# देवेंद्र फडणवीस यांच्या गृहमंत्रीपदाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचे वाटोळे झाले : संजय राऊत

**मुंबई । प्रतिनिधी**

नसरापूर येथील चार वर्षांच्या लहान मुलीच्या अत्याचार आणि हत्या प्रकरणात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच आरोपी करायला हवे. तसेच राज्य सरकारवर खटला चालवून, सरकारचाच एन्काऊंटर केला पाहिजे, अशी घणाघाती टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली. महिला अत्याचाराची ही राज्यातील काही पहिलीच घटना नाही.



देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यापासून महिलांवरील अत्याचार, हत्या या घटना वाढल्या असून कायदा व सुव्यवस्थेचं वाटोळं झालं आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले. ते रविवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांच्या गृहमंत्रीपदाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेचे वाटोळे झाले आहे कारण ते गृहमंत्री म्हणून कर्तव्य पार ▶▶ उर्वरित पान २ वर






# संतापजनक! जन्मदात्या बापाकडूनच गतीमंद मुलीवर वारंवार अत्याचार, मुलगी गर्भवती, लातूर हादरलं

**लातूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून धक्कादायक आणि संतापजनक घटनांची मालिका सुरु आहे. नसरापूर आणि बीडनंतर आता लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून अत्यंत अमानवी प्रकार उघडकीस आला आहे. बाल लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे.




जन्मदात्या पित्यानेच आपल्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

मुलगी गर्भवती असल्याचं समोर– या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने १७ एप्रिल रोजी जळकोट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीकडून मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, पीडित मुलगी सुमारे १९ आठवडे २ दिवसांची गर्भवती असल्याचे समोर आले होते, त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले. तक्रारीनंतर जळकोट पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयाच्या आधारे मुलीच्या वडिलांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसी चौकशीत संबंधित आरोपी वडिलांनीच हे कृत्य केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे.

जळकोट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, आरोपीला अटक– या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९९/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

# पालकांच्या मालमत्तेवर मुलाचा सरसकट अधिकार नाही

मुला-मुलीचा पालकांच्या मालमत्तेवर थेट हक्क असतो, असा आपल्यापैकी बहुतेक जणांचा समज आहे. एखादे घर किंवा जमीन अनेक वर्षे कुटुंबाच्या मालकीची असते, तेव्हा हा विश्वास अधिकच दृढ होतो.

पण तुम्ही हा गैरसमज बाळगला असेल तर भविष्यात तुम्हाला मालमत्तेसंदर्भात कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते.

कायदेशीर परिभाषेत मालमत्तेचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते: पहिला, 'स्व-अर्जित', म्हणजे स्वतःच्या कष्टाने कमावलेली मालमत्ता, आणि दुसरा, 'वंशपरंपरागत', म्हणजे वडिलोपार्जित मालमत्ता. हा केवळ एक मूलभूत फरक आहे, जो मुलांना मालमत्तेत वाटा मिळेल की नाही ? ठरवतो. जन्मसिद्ध हक्क सर्व मालमत्तेला लागू होतो, या गैरसमजातून अनेकदा कौटुंबिक वाद निर्माण होतात. कायदा पालकांना स्वतःच्या कमाईतून मिळवलेल्या मालमत्तेची योग्य वाटेल



त्याप्रमाणे वाटणी करण्याचा पूर्ण अधिकार देतो.

आई-वडिलांच्या सर्वच संपत्तीवर मुलांचा अधिकार असतो का ? बहुतेक प्रकरणांमध्ये मुलांना वाटतं की त्यांच्या आई-वडिलांची संपत्ती किंवा मालमत्तेवर केवळ त्यांचाच हक्क आहे. वारसा हक्काने मिळालेल्या मालमत्तेच्या बाबतीत असा समज असणे सामान्य आहे, पण कायदेशीरदृष्ट्या प्रकरण इतके सरळ नाही.मुलाचा आई-वडिलांच्या मालमत्तेवरील हक्क, मालमत्ता वडिलोपार्जित आहे की स्व-अर्जित आहे यावर अवलंबून असतो. हा एक महत्त्वाचा कायदेशीर फरक आहे, जो दावा केव्हा आणि किती वैध असेल ठरवतो.

पालकांच्या संपत्तीवर मुलांचा हक्क किती ?

तुमच्या वडिलांनी स्वतःच्या कमाईच्या पैशांनी मालमत्ता खरेदी केली असेल, तर ती स्व-अर्जित मालमत्ता मानली जाते आणि अशा परिस्थितीत, मालमत्तेच्या मालकाला दान करण्याचे, विकण्याचे किंवा मृत्युपत्राद्वारे कोणालाही हस्तांतरित करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. कायद्यानुसार, मुलांना स्व-अर्जित मालमत्तेवर कोणताही जन्मसिद्ध हक्क नसतो. तसेच मुलं या मालमत्तेवर कायदेशीररित्या कोणताही प्रभाव टाकू शकत नाही.

मुलांना जन्मसिद्ध हक्क कसा मिळतो ?

अशा परिस्थितीत, प्रश्न उपस्थित होतो की मुलांचा मालमत्तेवर कोणत्या परिस्थितीत जन्मसिद्ध हक्क असतो ? याचं उत्तर आहे वडिलोपार्जित म्हणजे 'वंशपरंपरागत' मालमत्ता. मालमत्ता कोणत्याही विभागणीशिवाय चार पिढ्यांपासून कुटुंबात हस्तांतरित होत आली असेल, तर त्याला वडिलोपार्जित मालमत्ता म्हणतात. अशी मालमत्ता हिंदू अविभक्त कुटुंबाचा भाग मानली जाते.

अशा मालमत्तेवर मुलांना जन्मतःच हक्क प्राप्त मिळतो आणि वडील ही विकायचा किंवा हस्तांतरित करायचा एकटे कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत तर त्यासाठी सर्व सहदायकांची संमती आवश्यक असते. कुटुंबातील सदस्य अल्पवयीन असला तरी, त्याचे पालक त्याच्या वतीने कायदेशीर निर्णय घेऊ शकतात, पण त्याचा वाटा संपुष्टात आणला जाऊ शकत नाही.

# 'पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी, आपुल्या घरात हाल सोसते मराठी...'

कवी सुरेश भटांच्या या ओळी आज कित्येक दशकांनंतरही महाराष्ट्राच्या काळजाला चटका लावून जातात. अभिजात भाषेचा मान मिळवलेल्या मराठी भाषेची आजची अवस्था नेमकी अशीच झाली आहे की काय, असा प्रश्न उभा पडतो. निमित्त आहे, राज्य सरकारने रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी लागू केलेली 'मराठी भाषेची सक्ती'. महाराष्ट्रात राहून, इथल्या रस्त्यांवर धंदा करूनही स्थानिक भाषेशी फटकून वागणाऱ्या परप्रांतीय चालकांना मराठी बोलण्याचे वावडे असल्याचे दिसते. त्यामुळे या निर्णयाला




होणारा विरोध आणि त्याभोवती फिरणारे राजकारण पाहता, मराठी भाषेचे तिच्याच घरात होत असलेले हाल सामान्य मराठी जनांना बघवत नाही.

राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार, मराठी भाषेची पडताळणी करताना जे चालक नापास होतील, त्यांचे परमिट आणि लायसन्स रद्द करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुजोरी चालणार नाही, मराठी शिकावीच लागेल असा सज्जड दम भरला असला, तरी सरकारमध्येच यावरून एकवाक्यता नसल्याचे दिसते. शिवसेना शिंदे गटाचेच नेते संजय निरुपम यांनी या निर्णयाला 'अन्यायकारक' ठरवून आपल्याच सरकारला घरचा आहेर दिला आहे. जेव्हा सत्ताधारी पक्षातील नेतेच मतांच्या राजकारणासाठी भाषेच्या मुद्यावर कच खातात, तेव्हा सामान्य मराठी माणसाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे.

मुंबई, ठाणे आणि पुण्यासारख्या शहरांत उत्तर भारतीय रिक्षा-टॅक्सी चालकांची संख्या लक्षणीय आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी महाराष्ट्रात आलेल्या या बांधवांचे स्वागत मराठी माणसाने नेहमीच उदार अंतःकरणाने केले. मात्र, 'पाहुणे पोसणाऱ्या' या भाषेचा मान राखण्याऐवजी, दहा-दहा वर्षे राहूनही मराठी न शिकण्याची मुजोरी अनेकदा पाहायला मिळते. उलट, मराठी माणसानेच हिंदीत बोलावे असा त्यांचा अट्टाहास असतो. ही मुजोरी केवळ भाषिक नाही, तर ती सांस्कृतिक आक्रमणही आहे. त्यामुळे अजुनही आपुल्याचा घरात हाल सोसते मराठी असे दुर्दैवाने म्हणावे वाटते.केवळ मतांच्या राजकारणासाठी या वर्गाकडे पाहणारे राजकीय पक्ष त्यांच्या या वृत्तीला खतपाणी घालत आहेत. या सर्व वादात एक कटू सत्य मान्य करावे लागेल की, मराठी भाषेच्या या हलाखीला कुठेतरी मराठी माणूसही जबाबदार आहे. आपण संवादाची सुरुवात करतानाच हिंदीतून करतो. समोरचा माणूस परप्रांतीय आहे हे ओळखताच आपण आपली 'मराठी' गुंडाळून ठेवतो. दक्षिण भारतात तमिळ, कन्नड किंवा मल्याळम भाषिक लोक आपल्या भाषेशी कधीच तडजोड करत नाहीत. तिथे गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला तिथली भाषा 'गरज' म्हणून शिकावीच लागते. महाराष्ट्रात मात्र, आपण 'लवचिक' होण्याच्या नादात आपल्या भाषेचा कणा मोडत आहोत. जर प्रत्येक मराठी माणसाने केवळ मराठीतच संवाद साधण्याचा आग्रह धरला, तर कोणताही सरकारी फतवा काढण्याची गरज उरणार नाही; जगण्यासाठी का होईना, समोरच्याला मराठी शिकावीच लागेल. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, हा अभिमानाचा विषय आहे. पण तो दर्जा टिकवण्यासाठी तिचा वापर वाढवणे गरजेचे आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे. त्यामुळे तिचे जतन हे केवळ सरकारचे नव्हे, तर प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे.

मराठीला आपल्याच घरात सोसावे लागणारे हाल थांबवायचे असतील, तर मराठी माणसाला 'भाषिक स्वाभिमान' जागा करावा लागेल. सरकारने मराठी शिकण्यासाठी मुदत दिली असली, तरी प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर वृत्तीचा आहे. महाराष्ट्रात राहून इथल्या मातीचा आणि भाषेचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जोपर्यंत मराठी माणूस स्वतःहून मराठीचा आग्रह धरत नाही, तोपर्यंत 'पाहुणे असंख्य पोसले' तरी मराठीचे 'हाल' थांबणार नाहीत. मराठी भाषा केवळ सक्तीने नव्हे, तर मराठी माणसाच्या कणखर भाषिक अस्मितेनेच टिकेल आणि फुलेल.

शेवटी, मराठीची सक्ती नव्हे, तर तिचा स्वाभिमान जपणे महत्त्वाचे आहे. सरकारने धोरणे आखताना समतोल साधावा आणि मराठी माणसाने आपल्या भाषेचा आग्रह कृतीतून दाखववावा. तेव्हाच आपुल्या घरात हाल सोसते मराठी ही वेदना दूर होईल.

◆ पान ९ वरून पुढे...

## गेवराईत विजेचा....

जाते कुठे? असा संतप्त सवाल सय्यद एजाज यांनी उपस्थित केला आहे.मध्यरात्रीही झोपमोडकेवळ दिवसाच नव्हे, तर रात्री २ ते २:३० वाजेच्या सुमारास वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे नागरिकांची झोपमोड होत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. भर उन्हाळ्यात रात्रीच्या वेळी वीज गेल्याने अस्वस्थता वाढली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.संपर्क यंत्रणा कोलमडलीनागरिकांनी तक्रार करण्यासाठी महावितरणच्या सबस्टेशनला फोन केल्यास, फोन 'नॉट रिचेबल' लागतो किंवा मुद्दाम 'बिझी' ठेवला जातो, असा आरोप सय्यद एजाज यांनी केला आहे. तक्रार निवारण यंत्रणाच निष्क्रिय झाल्याने दाद मागायची कोणाकडे, असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. व्यावसायिकांचे कंबरडे मोडलेवारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे आईस्क्रीम पार्लर, शीतपेय विक्रेते आणि लग्नसराईमुळे कामाचा व्याप असलेल्या टेलरिंग व्यावसायिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. कामाच्या वेळी वीज नसल्याने अनेकांचे रोजगार संकटात आले आहेत. आंदोलनाचा इशारामहावितरणने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन शहराचा वीजपुरवठा सुरळीत करावा. जर ही परिस्थिती सुधारली नाही, तर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांच्या नेतृत्वाखाली त्रस्त नागरिक महावितरण कार्यालयावर धडक देतील, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

## पेट्रोल-डिझेलसाठी....

कळंबा-धोकी परिसरात पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे.इंधनाच्या तुटवड्यामुळे अनेक पेट्रोल पंप बंद असून, त्यामुळे शेती आणि कृषी कामांमध्ये व्यत्यय येत आहे. लोकांना गंभीर संकटाचा सामना करावा लागत आहे. इंधनाच्यातुटवड्याचा त्यांच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या कमतरतेमुळे रहिवाशांमध्ये संताप निर्माण झाला आहे. बीड जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून डिझेलचा तुटवडा जाणवत आहे. अनेक भागांमध्ये डिझेल उपलब्ध नसल्याने मालवाहू वाहन चालक आणि प्रवासी वाहन चालक या दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय, शेतकऱ्यांना बीड जिल्ह्यातून इतर ठिकाणी शेतमाल वाहून नेण्यात अडचणी येत आहेत. डिझेलच्या तीव्र तुटवड्यामुळे ग्रामीण भागातील शेती आणि मालवाहतुकीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी डिझेल उपलब्ध नाही, आणि जिथे उपलब्ध आहे, तिथेही त्याचा पुरवठा अत्यल्प प्रमाणात होत आहे. यामुळे लांबचा प्रवास कसा करायचा, हा प्रश्न निर्माण झाला आहे. चालक आता प्रशासनाकडे या संदर्भात कारवाई करण्याची मागणी करत आहेत. शनिवारी सकाळी (३ मे) अनेक पेट्रोल पंप बंद आढळले, ज्यामुळे चालकांना मोठी गैरसोय झाली. या परिस्थितीमुळे आता स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभागांवर पुरवठा पूर्ववत करण्यासाठी वाढता दबाव येत आहे.

## देवेंद्र फडणवीस यांच्या...

पाडत नाहीत. त्यांच्या काळात सातत्याने लहान मुलींवर अत्याचाराची प्रकरणे समोर येत आहेत. महिला अत्याचारांचे प्रमाणही वाढीला लागले आहे. तरीही आमचे मुख्यमंत्री टिवल्या-बावल्या करत, केरळ, पश्चिम बंगाल, तामिळनाडू याठिकाणी प्रचार करत फिरतात. राज्याची अवस्था कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत गंभीर आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे २४ तास राजकारणात अडकले आहेत, अशी टीका संजय राऊत यांनी केली. मिसिंग लिंकच्या उद्घाटनावेळी झालेल्या ट्रॅफिक जॅमनंतर देवेंद्र फडणवीस यांनी विनम्रपणे माफी मागितली. पण त्यांनी कालच्या नसरापूरच्या प्रकरणात माफी मागायला पाहिजे. महिला अत्याचाराच्या प्रकरणांबाबत आणि गृहमंत्री म्हणून अपयशाबद्दल त्यांनी एकदा तरी माफी मागायला हवी. कदाचित पिडीत मुलीची आई सरकारची लाडकी बहीण असतील, तिला महिन्याला १५०० रुपये मिळत असतील. पण त्या मोबदल्यात लाडक्या बहिणीच्या मुलीवर अत्याचार करण्याचा अधिकार दिलाय का? तिने आम्ही देतो त्या १५०० रुपयांच्या मोबदल्यात तोंड बंद करावं, अशी सरकारची अपेक्षा आहे का? या महाराष्ट्रातील माता-भगिनींनी सरकाविरोधात बंड केले पाहिजे, सरकारला जाब विचारला पाहिजे, असे संजय राऊत यांनी म्हटले.

## कृषी प्रदर्शनाला....

शेतकऱ्यांना किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने किसान कृषिरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येते या कार्यक्रमास मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी चे कुलगुरू डॉक्टर इंद्रमनी , शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे, आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरण सोहळा साय. ६ वाजता पार पडणार आहे

शासनाच्याच्या विना मदतीने स्वखर्चातून सुरू आहे प्रदर्शन- गेल्या १८ वर्षापासून किसान कृषी विकास प्रतिष्ठान शासनाच्या कसलाही अनुदान न घेता हे प्रदर्शन स्वखर्चतून व कंपन्यांच्या प्रायोजक सहकार्यातून हे प्रदर्शन करते वाढलेली महागाई प्रचंड खर्च असतानाही संस्था स्वतःच्या कल्पकतेचा वापर करून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने या कृषी प्रदर्शनात नव आधुनिक तंत्रज्ञान देण्याचा प्रयत्न करते त्याचबरोबर मराठवाड्यातील मी काही कार्य शेतीमध्ये केले आहे अशा शेतकऱ्यांनाही दरवर्षी पुरस्कार देऊन सन्मानित करते ही बाब महत्त्वाची आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## गेवराई गट शिक्षणाधिकारी...

शिक्षणाधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांच्या कार्यकाळात प्रशासनिक शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि शिक्षकांशी समन्वय या बाबींना विशेष प्राधान्य दिले गेल्याचे सहकारी शिक्षकांकडून सांगितले जाते. शांत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून नांदुरकर यांची ओळख असून, त्यांच्या नियुक्तीमुळे गेवराई तालुक्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक शिक्षकांनी त्यांच्या नियुक्तीचे स्वागत करत शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, गेवराई तालुक्यात शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची संख्या मर्यादित असल्याने उपलब्ध मनुष्यबळावरच संपूर्ण शिक्षण विभागाचे कामकाज चालवावे लागते. अशा परिस्थितीत प्रशासनिक शिस्त व समन्वय राखणे हे मोठे आव्हान मानले जाते. तसेच शाळांवर नोकरी न करता गट शिक्षण कार्यालयात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या काही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांना त्यांच्या मूळ नियुक्ती ठिकाणी परत पाठविण्याची महत्त्वाची जबाबदारीही नवीन गट शिक्षणाधिकारी नांदुरकर यांच्यावर असणार आहे. गेवराई तालुक्याला अनुभवी व शिस्तप्रिय अधिकारी लाभणे ही आनंदाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया शिक्षक वर्गातून व्यक्त होत असून, त्यांच्या कार्यकाळात तालुक्याच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निस्वार्थ सेवा....

यावेळी उपस्थित मान्यवर मा.रवींद्र जोगदंड, मा.अशोक शिरसे, मा.सुरेश लोंढे आणि मा.दीपक कदम यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त करत तुलसी शैक्षणिक संकुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत विविध शैक्षणिक, कौशल्यविकास आणि सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांकडे स्किल आणि विल असेल, तर तो जगाच्या पाठीवर कुठेही स्वाभिमानाने, अभिमानाने आणि आर्थिकदृष्ट्या सक्षमपणे उभा राहू शकतो. विशेषतः मुलींना सशक्त, स्वावलंबी आणि उद्योजक बनविणे हेच आमचे ध्येय आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रो.डॉ. मनोहर शिरसाट यांनी केले, तर आभार प्रा विद्या अवघडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समूहातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य सोहळ्यास बीड जिल्ह्यासह परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठेवी बुडविणाऱ्या....

असून अनेक कुटुंबांचे संसार अक्षरशः उद्ध्वस्त झाल्याची भावना व्यक्त होत आहे. या प्रकरणात शिवप्रसाद सक्रांते यांच्यावर विविध ठिकाणी गुन्हे दाखल असल्याची चर्चा असूनही त्यांच्यावर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप ठेवीदारांकडून केला जात आहे. गुन्हा दाखल होतो, पण काही वेळातच सुटका कशी होते? असा सवाल आता सर्वसामान्य ठेवीदारांमधून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटने ग्रामीण भागातील लोकांना जास्त व्याजाचे स्वप्न दाखवून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. अनेकांनी मुलींच्या लग्नासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, शेतीसाठी किंवा वृद्धापकाळासाठी साठवलेली आयुष्यभराची पुंजी या संस्थेत जमा केली होती. काहींनी तर घरातील दागिने गहाण ठेवून किंवा शेती विकून ठेवी केल्याचेही समोर येत आहे. मात्र आता पैसे परत मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. लेकीच्या लग्नासाठी ठेवलेले पैसे अडकले, घर बांधण्यासाठी घेतलेली बचत संपली, उपचारासाठी ठेवलेली रक्कम मिळत नाही अशा वेदनादायी प्रतिक्रिया ठेवीदार व्यक्त करत आहेत. अनेक गरीब कुटुंबांतील मुलींचे संसार उद्ध्वस्त झाल्याचे सांगितले जात असून, या सर्व परिस्थितीस जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, माजलगाव तालुक्यात गेल्या काही वर्षांत विविध मल्टीस्टेट पतसंस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढले. ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीचा फायदा घेत काही संस्थांनी आकर्षक योजनांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी गोळा केल्या. सुरुवातीला वेळेवर परतावा देऊन विश्वास निर्माण करण्यात आला, मात्र नंतर अनेक संस्थांचे व्यवहार संशयास्पद झाल्याने ठेवीदारांचा विश्वास डळमळीत झाला. मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटच्या प्रकरणानंतर आता इतर मल्टीस्टेट संस्थांकडेही संशयाने पाहिले जाऊ लागले आहे. परिणामी, अनेक ठेवीदार आपापल्या ठेवी काढण्यासाठी शाखांमध्ये गर्दी करू लागले आहेत. आपला पैसा सुरक्षित राहील का? या भीतीमुळे ग्रामीण भागात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, काही मल्टीस्टेट संस्था आजही नियमांनुसार आणि पारदर्शकपणे काम करत असून त्यांनी जनतेचा विश्वास टिकवून ठेवला आहे. मात्र काही संस्थांच्या गैरप्रकारांमुळे संपूर्ण सहकार क्षेत्राची प्रतिमा मलीन होत असल्याची खंतही व्यक्त केली जात आहे. या प्रकरणात प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, ठेवीदारांचे पैसे परत मिळवून द्यावेत आणि गोरगरिबांना न्याय द्यावा, अशी मागणी आता तीव्र होत आहे. अन्यथा ठेवीदारांचा संताप आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बीड कृषी प्रदर्शनाचे...

पालनासाठी अनुदान देणार आहे काय? आणि शेतकऱ्यांचा कळवळा म्हणून कृषी प्रदर्शन भरवणा-या आयोजकांनी ५० रूपये प्रवेश शुल्क ठेऊन याला व्यावसायिक रुप देऊन शेतकऱ्यांची क्रुर थट्टा केल्याची तिव्र प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबाणेशकर यांनी दिली असुन कृषी विभाग याकडे डोळेझाक करत असल्याने शेतकऱ्यांनी याबद्दल तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## गेवराई पोलीसांची....

पोह/२२३ कल्याण राठोड, पोकॉ/२४१ गोरक्ष डोके, पोकॉ/२१९८ धिरज खांडेकर आणि पोकॉ/२१०४ ऋषी पोटे यांनी सहभाग घेतला. अवैध वाळू उपशावर गेवराई पोलिसांची ही कारवाई परिसरात चर्चेचा विषय ठरली असून पुढील तपास सुरू आहे.

## पत्नी आणि मेव्हुणीनं....

मारहाण करत असत. ६ सप्टेंबर रोजी पुन्हा त्यांच्यात मोठा वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्याने पत्नी संगीताने आपली बहीण सविता आणि साडू विष्णू वाजे यांच्या मदतीने उद्धव यांचा गळा दाबून खून केला. खून केल्यानंतर आरोपींनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी अत्यंत नियोजनबद्ध पावले उचलली, विष्णू वाजे याने आपल्या दोन अल्पवयीन मुलांच्या मदतीने सुरुवातीला मृतदेह उसाच्या शेतात लपवला. दोन-तीन दिवसांनी मृतदेहाचा वास येऊ लागल्याने आरोपींनी प्रेत गोणीत भरून दुचाकीवरून शहागड येथील जुन्या पुलावरून गोदावरी नदीत फेकून दिले. त्यानंतर दोन दिवसांनी मृतकाची मोटारसायकलही त्याच पुलावरून नदीपात्रात फेकून दिली जेणेकरून कोणताच पुरावा उरणार नाही. मुख्य आरोपी संगीता शिंदे हिने संशय येऊ नये म्हणून पुणे येथील सिंहगड पोलीस ठाण्यात पती बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. गेल्या ८ महिन्यांपासून हे प्रकरण शांत होते. मात्र, मृतकाचा मुलगा शुभम शिंदे याला वडिलांच्या बाबतीत काहीतरी अघटीत घडल्याचा संशय होता. २ मे २०२६ रोजी शुभमने गेवराई पोलीस ठाणे गाठून आपली शंका बोलून दाखवली. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. पांढरवाडी येथून विष्णू आणि सविता वाजे यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. या प्रकरणी पोलिसांनी गोदावरी नदीपात्रातून मृतकाच्या दुचाकीचा सांगाडा जप्त केला आहे. मुख्य आरोपी संगीता शिंदे हिला नन्हे (पुणे) येथून ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात कलम १०३(१), २३८, ६६(२) भा.न्या.सं. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सपोनि दीपक लंके पुढील तपास करत आहेत. सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. किशोर पवार व त्यांच्या पथकाने केली आहे.

## उन्हाची तीव्रता वाढतीच...

तापमानात वाढ कायम राहिल्यास बाष्पीभवनाचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे. बाष्पीभवन वाढत असल्याने पाणी जपून वापरणे गरजेचे आहे. आवर्तनामुळे उभी पिके तग धरून असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. ठिबक व तुषार सिंचनाचा वापर केल्यास उपलब्ध पाण्यात अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणता येईल. - अंकुश नरवडे, शेतकरी

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# धाराशिवच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही: पालकमंत्री प्रताप सरनाईक

## समिती बैठकीत विकास, पर्यटन, शिक्षण व पायाभूत सुविधांवर भर; १०० टक्के निधी खर्चाची उल्लेखनीय नोंद

**धाराशिव । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही,अशी ठाम ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात १ मे रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.या बैठकीस आमदार राणाजगजितसिंह पाटील,जिल्हा परिषद उपाध्यक्ष अर्चना पाटील,आमदार कैलास पाटील घाडगे, आमदार प्रवीण स्वामी,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,पोलीस अधीक्षक रितू खोखर,महिला व बालकल्याण समिती सभापती पूजा शिंदे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्याचे



मागासलेपण दूर करून विकासाला गती देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे श्री.सरनाईक यांनी स्पष्ट केले.जिल्ह्याचा आकांक्षित जिल्ह्यात समावेश झाल्याने विकासाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या असून पर्यटनवृद्धीसाठी जिल्ह्यातील विविध स्थळांचे नियोजनबद्ध आराखडे तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तुळजापूर विकास आराखडा अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत स्थानिक पर्यटन स्थळांच्या विकासातून रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ट्राफिक गार्डन उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.याशिवाय विविध विभागीय समित्या लवकरच स्थापन करण्यात येणार असून लोकप्रतिनिधींच्या सक्रिय सहभागातून विकासाला चालना दिली जाईल,असे त्यांनी सांगितले. बैठकीत अर्चना पाटील यांनी शाळा, क्रीडांगणे, अंगणवाडी, महिला भवन, जलजीवन मिशन, पशुसंवर्धन दवाखाने आणि ग्रामविकास योजनांसाठी निधीची मागणी केली. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी निधीतील कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्यावर भर दिला, तर आमदार कैलास पाटील यांनी धोकादायक शाळा खोल्यांच्या पुनर्बांधणीसह आदिवासी उपयोजनांसाठी प्राधान्याने निधी देण्याची मागणी केली.

बैठकीत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षातील विकास निधी खर्चाचा आढावा घेताना जिल्ह्याने उल्लेखनीय प्रगती साधल्याचे स्पष्ट झाले.

## श्री नारायण मा.व उ. मा. विद्यालय आहेर चिंचोली इ. १२ वीचा निकाल ९६.१६% टक्के लागला



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री नारायण मा. व.उ.मा. विद्यालय आहेर चिंचोली विज्ञान शाखेचा निकाल १००% टक्के लागला आहे.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नारायण महाविद्यालयाने आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विज्ञान शाखेचा निकाल प्रत्येक वर्षी १००% लागतो. फेब्रुवारी २०२६ मध्ये इयत्ता बारावी मध्ये प्रविष्ट विद्यार्थी विज्ञान शाखेत १९५ पैकी ३९ विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले असून, प्रथम श्रेणीत १२७ उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेतून – प्रथम क्रमांक अनुष्का बाळासाहेब पिंगळे –८७.८३, द्वितीय क्रमांक – यश दिलीप काळे –८६.३३. तृतीय क्रमांक – ऋतुजा उद्धव सोनवणे ८४.८३, कृष्णा राजाभाऊ ठोसर –८४.८३, चतुर्थ क्रमांक – मोनिका महादेव गायके –८२.८३ पाचवा क्रमांक – जान्हवी शंकर पिंगळे –८२.६७, ओंकार दत्तात्रय काळे –८२.६७. कला शाखेचा निकाल ८४.८४% टक्के लागला असून प्रथम क्रमांक कु. चित्ताडे तनुजा अभिमन्यू ८६.१७%, द्वितीय क्रमांक कु. पगारिया इशा अभिजीत ७८.६७%, तृतीय क्रमांक कु. खांडेकर सिद्धी लक्ष्मण ७७.६७, चतुर्थ क्रमांक कु. अडकिने पूजा शिवाजी ७५.५०%. . सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष माननीय श्री महादेवरावजी काळे अण्णा , संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परिसरातील ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आह

## स्लिम संरक्षण कायद्याच्या मागणीसाठी बीडमध्ये धरणे आंदोलन; मॉबलिंचिंग पीडितांना मदत आणि सरकारी नोकरीसाठी मागणी

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक समाजावर नेहमी अत्याचार, मॉबलिंचिंग, हेटस्पिच होते. तसेच, दंगली घडविल्या जातात व संविधानिक पदांवरील मंडळी अल्पसंख्याक मुस्लिम समाजाप्रती बेताल वक्तव्ये करत असल्याचा आरोप करत याविरुद्ध कारवाई करावी आणि मुस्लिम आरक्षण कायदा लागू करावा, या मागणीसाठी शुक्रवारी (ता. एक) महाराष्ट्रदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. कायदा बनवून समाजाला सुरक्षा द्यावी, अशा मागणीचे निवेदन



जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. सकाळी साडेदहा ते दुपारी चारपर्यंत हे आंदोलन चालले. मॉबलिंचिंग व जातीय दंगलीत मयत व्यक्तीच्या परिवाराला ५० लाखांची मदत द्यावी, अपंगत्व आल्यास २५ लाख द्यावे, पीडित कुटुंबांतील एकाला शासकीय नोकरीत घ्यावे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या. समितीचे निमंत्रक ॲड. इलियास इनामदार, मुज्तबा अहमद खान, जावेद मणियार, खदीर शेख, अखिल अन्ना, हमिद पालेखान, शेख ऐतेशाम, शेख मैनुद्दिन, सलीम खान, डॉ. शेख मोहसीन, आबेद कादरी, सय्यद नबीलुज्जमा, पठाण खदीरुज्जमा, मुशीर इनामदार, पठाण अमरजान, शामीर खान, इमरान इनामदार, शेख खदीर, गुड्डू चाऊस, हाफिज मोहम्मद, अर्सलान शेख, नदीम अकबर आदींनी आंदोलनात सहभाग घेतला. माजी आमदार सिराज देशमुख, माजी आमदार उषा दराडे, मोईन मास्टर, शेख मुजीब, फारुक पटेल, एमआयएम जिल्हाध्यक्ष ॲड. शफिक शफिक, खुर्शीद आलम, शेख निजाम, शेख मुफ्ती अब्दुल्ला, कासमी मौलाना साबीर, मौलाना जफर आदींनी आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा दिला.

## बलभीम महाविद्यालयाची बारावी बोर्ड परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

### महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ८९%

**बीड । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ८९% असून महाविद्यालयाने प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही निकालात उत्तुंग अशी भरारी घेतली आहे.

बारावी विज्ञान शाखेचा निकाल – ८९.८४ %, कला शाखा– ६८.४२% व वाणिज्य शाखा– ९६.३२% लागला असून महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखा– १) गुंड शर्वरी विजय– ८७%. २) चाळक पार्थ उद्धव– ८४.५० %. ३) मुगदिया अगम माधव– ८३.६७ %

कला शाखा– १) पालवे अभिषेक अशोक– ८९.६७%. २) मसकर शुभांगी हनुमान ८३.६७% . ३) जाधव धनश्री गणेश– ७७.१७% . वाणिज्य शाखा– १) ऋषी अवंतिका महिंद्रा– ९१.६७%. २) दळवे गायत्री दिनेश– ९१.१७%. ३) काळे अमृता अनंत– ९१% . वरील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. बारावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ.श्री. प्रकाश सोळंके, सरचिटणीस मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष तथा महाविद्यालय विकास समिती प्रमुख मा. श्री.अमरसिंह पंडित, महाविद्यालय विकास समिती सदस्य मा.श्री.अजय पाटील, मा.संतोष जाधव, मा. श्री. धैर्यशील विडेकर, निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती. ॲड. सुभाष राऊत, मा.श्री. सुनिल क्षीरसागर, मा. श्री. दिनेश मुंदडा, मा.श्री.अब्दुल अकील अब्दुल,जमील, मा.श्री.भानुदास जाधव, मा.डॉ. कृष्णा केंडे, शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिल्हास्तरीय मुलींची खो-खो स्पर्धा उत्साहात संपन्न

### आष्टीच्या जामगावचा प्रथम क्रमांक, राजर्षी शाहू कन्या विद्यालय द्वितीय तर गेवराईचा तृतीय क्रमांक

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, राजमाता इंग्लिश स्कूल, बीड तसेच एमॅच्युअर खो–खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०२ मे २०२६ रोजी जिल्हास्तरीय मुलींची खो–खो स्पर्धा उत्साहात पार पडली.

ही स्पर्धा आज राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या प्रांगणातील क्रीडा मैदानावर आयोजित करण्यात आली होती.

ही स्पर्धा संस्थेचे संचालक श्री. विश्वनाथराव जाधव माणूसमारे (काका) यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आली होती. १७ वर्षांखालील मुलींसाठी आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन श्री.



जाधव माणूसमारे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बलभीमराव जाहेर पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, एमॅच्युअर खो–खो असोसिएशनचे सचिव विजय जाहेर, कोषाध्यक्ष योगेश सोळसे, मुख्याध्यापिका श्रीमती एस. डी. कदम, मुख्याध्यापक आर. टी. राऊत तसेच तुकाराम करांडे, आदनाक सर, बंडू घोरड, अंकुश गायकवाड, श्रीमती जायभाय मॅडम, रोहिणी देवगुडे, महेश वायभसे, प्रतीक कवडे, नवनाथ चव्हाण आणि अनिकेत पवार यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अंतिम सामन्यात बीड व जामगाव संघांमध्ये रंगतदार लढत झाली.

स्पर्धेतील निकाल पुढीलप्रमाणे – प्रथम क्रमांक: निवृत्तीराव धस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामगाव (ता. आष्टी, जि. बीड). द्वितीय क्रमांक: राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालय, बीड. तृतीय क्रमांक: न्यू हायस्कूल, गेवराई. विजेत्या संघांना अनुक्रमे रु. ५१०१, रु. ३१०१ व रु. २१०१ अशी पारितोषिके तसेच सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जगताप एस. सी. यांनी केले. विद्यार्थिनी, पालक व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गजानन विद्यालयाचा बारावीचा शेकडा निकाल ९७.९३%

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नवगण राजुरी येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९७.९३% इतका लागला असून यावर्षी पण या कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून इ.१२ वीच्या परीक्षेला विज्ञान शाखेचे ४८७ पैकी ४८५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शेकडा निकाल ९९.५८% टक्के आणि वाणिज्य शाखेचे ३८ पैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शेकडा निकाल ९७.३६% तर कला शाखेचे १०० पैकी ९२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शेकडा निकाल ९२.००% एवढा लागला असून गुणानुक्रमे विज्ञान शाखेतून प्रथम कु. पोकळे अमृता रामदास ९१.१७%, द्वितीय कु. जोगदंड वृषाली विष्णु ९१.००%, तृतीय कु. जायभाये अक्षरा शेषेराव ९०.६७%, कु. कोकाटे श्रावणी नितीन ९०.६७%, कला शाखेतून प्रथम कु. चव्हाण आम्रपाली जालिंदर ८५.८३%, द्वितीय कु. राहिंज प्रतिभा सदाशिव ८३.८३%, तृतीय कु. लकडे रूपाली बाबुराव ७८.३३%, आणि वाणिज्य शाखेतून प्रथम चि. ठोसर अजय बाळू ८३.८३%, द्वितीय कु. कटकाळे वैष्णवी रामा ७५.००%, तृतीय चि. काळे आदर्श दत्तात्रय ७२.३३% घेवून उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ. राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ,

## गेवराई तालुक्यातील धोंडराई येथील जिल्हा परिषद शाळेचे यश स्टुडंट पोलीस कॅडेट छ.संभाजीनगर परिक्षेत्रातून तृतीय

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस ग्राउंड बालेपीर, बीड येथे राष्ट्रीय उपक्रमांतर्गत छ. संभाजीनगर परिक्षेत्रातून ६० शाळांचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये धोंडराई जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ता. गेवराई ही शाळा पात्र स्टुडंट पोलीस कॅडेट (एसपीसी) कार्यक्रमांतर्गत संभाजीनगर परिक्षेत्रातून तृतीय आली. याबद्दल शाळेतील विद्यार्थ्यांना तृतीय क्रमांकांचे पारितोषिक व प्रशिस्तीपत्रक तसेच पुष्पगुच्छ देवून जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीव कॉंवत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांच्या उपस्थितीमध्ये मिळाले. यावेळी



शाळेचे मुख्याध्यापक गणेश शहाने, क्रीडा शिक्षक जगन्नाथ जाधव, डॉ.तात्यासाहेब मेघारे, जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर, एसपीसी सदस्य पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर उपस्थित होते. हा कार्यक्रम अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाखाली व जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी दिलीपकुमार खेडकर यांच्या अधिपत्याखाली नोडल ऑफिसर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार सखाराम घोलप, पोलीस नाईक मिलींद सारणीकर, पोलीस अंमलदार रोहीत शिंदे यांनी परिश्रम घेवून जिल्ह्यातील जि.प.मा.शाळा सौताडा ता.पाटोदा, जि.प.मा. शाळा शिरुर का., जि.प.मा.शाळा धारुर, जि.प.मा.शाळा हरिनारायण आष्टा ता.आष्टी,

## उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा विज्ञान शाखेचा १०० टक्के तर कला शाखेचा ९३.२२ टक्के निकाल

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासून जवळच श्री सद्गुरु बंजारा सेवा संघ संचलित, उच्च माध्यमिक आश्रमशाळा अंधरवण पिंपरी तांडा ता. जि.बीड. इ.१२ वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ चा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा ९३ टक्के निकाल लागला. इ.१२ वी विज्ञान शाखेतून प्रथम देशमुख सर्वेश गिरिष (८३.८३%), व्दितीय तांगडे सायली राजेंद्र (८३.१७%), तृतीय यादव सोहम नवनाथ (८२.६७%), चौथा पवार शुभम तात्या (८१.३३%), राठोड तेजस्विनी राम (८०.५०%) या विद्यार्थीनीने पाचवा क्रमांक मिळविला. इ.१२ वी विज्ञान परीक्षेस १५० विद्यार्थी बसले होते. विज्ञान शाखेतून प्रथम श्रेणीमध्ये ८८, व्दितीय श्रेणी ३७, विशेष प्राविण्यासह २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर कला शाखेचा ९३.२२% निकाल लागला असून या शाखेतून प्रथम क्रमांक आव्हाड महादेव गुनाजी (६०.८३%), व्दितीय–प्रभाळे वैभव राजेभाऊ (६०.००%), तृतीय–शिंदे आकांक्षा धोंडीराम (५८.६७%), तृतीय– गिरी इश्वर बाबु (५८.६७%), नखाते प्रदिप संतोष (५७.६७%) या विद्यार्थ्याने चौथा क्रमांक मिळविला. कला शाखेतून इ.१२ वी परीक्षेस ५९ विद्यार्थी बसले होते. विशेष प्राविण्यासह – प्रथम श्रेणी–२, व्दितीय श्रेणी–४०, तृतीय श्रेणीरठवींश्र–१३ उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मार्गदर्शक सुशील पवार, संस्थेचे सचिव अतुल पवार, प्राचार्य खंदारे सर, मुख्याध्यापक शिंदे डी.ए सर, पर्यवेक्षक जवरे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर

## महाराष्ट्र दिनानिमित्त व्यसन मुक्तीची शपत

**नेकनूर । प्रतिनिधी**

दिनांक ०१में २०२६ रोजी प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,नेकनूर येथील राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या अंतर्गत नशा मुक्त भारत अभियान अमली पदार्थ व्यसन व सेवनाविरुद्ध व जनजागृती करण्याच्या उद्देशाने ०१ में रोजी प्रथम ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर नशा मुक्तीची शपत देण्यात आली. महाराष्ट्र दिनानिमित्त सर्व स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी, शिक्षक कर्मचारी यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . ढास डी. के. यांच्या उपस्थितीत शपथ देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

भारत नशा,अमलीपदार्थ मुक्त झाला पाहिजे यासोबतच महाराष्ट्र दिनानिमित्त महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या उपस्थितीमध्ये नशा मुक्त भारत याची शपत देण्यात




आली. तंबाखूजन्य पदार्थ, सेवन करू नये या पदार्थ सेवनामुळे कर्करोग सारखे अनेक आजार मानवास होत आहेत आपले आरोग्य चांगले राहण्याकरता नशा मुक्ती झालीच पाहिजे असे आव्हान प्राचार्य डॉ. ढास डी के. यांनी केले. स्वयंसेवकाने विरोध करावा धूम्रपान मनाई करावी. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के., कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. इनकर व्ही.एस., प्रा.डॉ.रामरूले डी. के., सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. मुजावर एस. टी. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

दैनिक
# मराठवाडा पत्र



## गेवराई गट शिक्षणाधिकारी पदी भीमाशंकर नांदुरकर यांची नियुक्ती ; शिक्षक वर्गात समाधानाचे वातावरण



**गेवराई । प्रतिनिधी :** पंचायत समिती कार्यालयाअंतर्गत असलेल्या गटशिक्षण कार्यालयात कार्यरत असलेले ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदुरकर यांची बीड जिल्हा परिषदेच्या वतीने गेवराई तालुक्याच्या नवीन गट शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत आदेश दि. २५ एप्रिल रोजी निर्गमित करण्यात आले असून, त्यांनी मावळते गट शिक्षणाधिकारी प्रवीण काळम पाटील यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे. भीमाशंकर नांदुरकर हे बीड जिल्ह्यातील रहिवासी असून शिक्षण क्षेत्रात त्यांचा दीर्घ व अनुभवी प्रवास राहिला आहे. त्यांनी यापूर्वी वडवणी, अंबाजोगाई तसेच परळी येथे गट ▸▸ उर्वरित पान २ वर

# निस्वार्थ सेवा आणि सामाजिक बांधिलकीमुळेच 'तुलसी' ला यश मिळाले: पुज्य भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो

### तुलसी फॅशन कॉलेजच्या नूतन वास्तू व 'तुलसी क्रिएशन' शोरूमचे दिमाखात उद्घाटन संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

प्रा.प्रदीप रोडे यांनी निस्वार्थ सेवाभाव, नैतिकता, शील आणि सदाचार या मूल्यांच्या आधारावर उभारलेले तुलसी शैक्षणिक संकुल आज सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्थान ठरले आहे. केवळ पैशाने नव्हे, तर समाजासाठी वेळ, बुद्धी आणि संपत्ती खर्च केल्यानेच खरे यश प्राप्त होते. प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या कार्यातून हाच आदर्श समाजासमोर उभा केला आहे, असे प्रतिपादन पुज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो यांनी केले. देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीचे तसेच 'तुलसी क्रिएशन – द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड' या शोरूमचे उद्घाटन रविवारी (दि. ३ मे) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते मुख्य उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत आणि बुद्धवंदनेने झाला. यावेळी पुज्य भदंत करुणानंद महाथेरो आणि पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी मंगल आशीर्वाद दिले. या ऐतिहासिक सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा.रवींद्र जोगदंड, मा.दीपक कदम, मा.डॉ. सिद्धार्थ जोंधळे, मा.सुरेश लोंढे, मा.सुदिन गायकवाड, मा.सुधाकर बनटे, मा.संदीप उपरे, मा.पी.टी .मुने, मा.रविंद्र कोलप, मा.दीपा रोडे तसेच प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह अनेक प्रशासकीय अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना पुज्य भदंत करुणानंद महाथेरो म्हणाले की, प्रा.प्रदीप रोडे यांच्या हातून आदर्श शैक्षणिक कार्य घडत आहे. त्यांच्या नावातच 'प्रदीप' म्हणजे प्रकाश आहे. भगवान बुद्धांच्या 'अत्तदीपो भव' या संदेशाप्रमाणे त्यांनी स्वतः प्रकाशमान होत असंख्यांच्या जीवनात ज्ञानदीप प्रज्वलित केला आहे. त्यांचा सात्विक स्वभाव आणि समाजाभिमुख कार्य प्रेरणादायी आहे, असे म्हणाले.तर, पुज्य भदंत धम्मशील थेरो यांनी प्रा. प्रदीप रोडे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचे कौतुक केले. शून्यातून सुरू झालेला त्यांचा प्रवास कष्ट, परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर यशाच्या शिखरापर्यंत पोहोचला आहे. प्रचंड गरिबीत शिक्षण घेत त्यांनी शिकणाऱ्यापासून शिकवणाऱ्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास घडविला, असे सांगितले.

▸▸ उर्वरित पान २ वर

# ठेवी बुडविणाऱ्या मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटकडून गोरगरिबांच्या घरावर नांगर

■ पोलीस प्रशासन शिवप्रसाद सक्रांते यांच्यावर एवढे कसे मेहरबान ?

■ अनेक लोकांच्या संसाराची राख ; ठेवीदारांचा जीव टांगणीला




**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यासह परिसरात मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटच्या प्रकरणामुळे ठेवीदारांमध्ये मोठी भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून गोरगरिब, शेतकरी, कष्टकरी आणि महिलांकडून लाखो रुपयांच्या ठेवी जमा करण्यात आल्या. मात्र आता अनेक ठेवीदारांना स्वतःच्या पैशासाठी दारोदार फिरण्याची वेळ आली ▸▸ उर्वरित पान २ वर

**● मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटवर कुलूप, तरी अनधिकृत वसुली सुरूच ?**

मुक्ताई अर्बन मल्टीस्टेटच्या चेअरमन व सदस्यांवर गुन्हे दाखल असून संस्था सध्या बंद असल्याचे सांगितले जात असतानाही काही ठिकाणी अनधिकृत वसुली सुरू असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. यासाठी मोठे सोशल मीडिया ग्रुप तयार करण्यात आले असून आश्वासने दिली जात आहेत. मात्र ठेवीदारांनी पैसे मागण्यासाठी चेअरमन किंवा संचालकांना फोन केल्यास अरेरावीची भाषा वापरून खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ठेवीदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**● ठेवीदारांना धमक्या ; कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल**

मुक्ताई अर्बन मल्टीस्टेट प्रकरणात ठेवीदारांना धमक्या दिल्या जात असल्याची गंभीर चर्चा सध्या सुरू आहे. ठेवीदारांनी आपल्या ठेवीची मागणी केल्यानंतर तुमच्याकडे बघून घेऊ, आमच्यावर गुन्हे दाखल झाले तरी आम्ही बाहेरच आहोत अशा प्रकारच्या धमक्या दिल्याचे कथित कॉल रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. या रेकॉर्डिंगमुळे मुक्ताई अर्बनमधील शिवप्रसाद सक्राते व त्यांच्या सहकाऱ्यांवर गंभीर आरोप होत आहेत. दरम्यान, ठेवीदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# बीड कृषी प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण सरडा म्हणजे शेतकऱ्यांची क्रुर थट्टाच! सरकार सरडे पालनासाठी अनुदान देणार काय? : डॉ.गणेश ढवळे





**बीड । प्रतिनिधी**

येथील छत्रपती संभाजी क्रिडांगणावर १ मे ते ५ मे दरम्यान भरविण्यात येणाऱ्या कृषी प्रदर्शनाचे मोठ्या थाटामाटात राजकीय पुढाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि कृषी विकास प्रतिष्ठान गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कृषी प्रदर्शनाचे सुरूवातीपासूनच. मोठमोठ्या जाहिरातीद्वारे मुख्य आकर्षण म्हणून दक्षिण अमेरिकेतील साडे ५ फुटी इग्वानाजातीच्या सरड्याची दर्शनी भागात मोठमोठे होर्डिंग्ज लाऊन जाहिरातबाजी करण्यात आली.सततच्या अवकाळी पाऊस आणि दुष्काळी नैसर्गिक संकटामुळे मराठवाड्यातील सगळ्यात जास्त शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून बीड जिल्हा ओळखला जातो. कृषी प्रदर्शनातून शेती आणि मातीशी नाळ जुळलेल्या शेतकऱ्यांना संकटातून उभारी यावी यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाविषयी माहिती, प्रगतीशील शेतकऱ्याचे विकसनशील प्रयोग आदींची आवश्यकता असताना या प्रदर्शनात मुख्य आकर्षण म्हणून साडे ५ फुटीच्या सरड्याचा तमाशा नेमका कशामुळे ? सरकार शेळी अथवा कुक्कुटपालन याप्रमाणेच सरडे ▸▸ उर्वरित पान २ वर

# गेवराई पोलीसांची मोठी कारवाई

### म्हाळसपिंपळगाव शिवारात गोदावरी पात्रातून अवैध वाळू उपसा उघड, दोन ट्रॅक्टर जप्त



**चकलंबा । प्रतिनिधी**

गेवराई पोलीसांनी म्हाळसपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर मोठी कारवाई करत दोन ट्रॅक्टर व केनीसह सुमारे १३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी ही कारवाई केली. दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिस पथकाने सकाळी ११:१० वाजता मौजे म्हाळसपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान केनीच्या साहाय्याने अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे आढळून आले. घटनास्थळी विनाक्रमांकाचे दोन ट्रॅक्टर आढळून आले.

पोलीसांनी दोन्ही ट्रॅक्टर व केनी जप्त करून एकूण अंदाजे १३,००,००० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. सर्व मुद्देमाल पोलीस ठाण्यात आणण्यात आला असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक किशोर पवार, ग्रेड पोउपनि सुरेश सफौ/१०४५ नितीन शिंदे, ▸▸ उर्वरित पान २ वर

# पत्नी आणि मेव्हुणीनं गळा दाबून खून केला, साडूनं शेतात मृतदेह लपवला



**बीड । प्रतिनिधी**

कौटुंबिक वादातून पत्नीने आपल्या बहिणीच्या आणि साडूच्या मदतीने पतीचा गळा दाबून हत्या केल्याची धक्कादायक घटना गेवराई तालुक्यातील पांढरवाडी फाटा येथे उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, आरोपींनी पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह आणि दुचाकी चक्क गोदावरी नदीत फेकून दिली होती. तब्बल ८ महिन्यांपूर्वी घडलेल्या या 'थंड डोक्याने' केलेल्या खुनाचा छडा लावण्यात गेवराई पोलिसांना यश आले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील रहिवासी उद्धव तुकाराम शिंदे (५०) हे ३ सप्टेंबर २०२५ रोजी पत्नी संगीतासह गेवराई तालुक्यातील पांढरवाडी येथे आपल्या मेव्हणीच्या घरी (सविता विष्णू वाजे) आले होते. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, उद्धव शिंदे हे नेहमी पत्नीला ▸▸ उर्वरित पान २ वर

# उन्हाची तीव्रता वाढतीच : चाळीस टक्के साठा; आणखी एक आवर्तन मिळणार, पिकांना दिलासा; माजलगाव धरणातून वेगाने घटतोय पाणीसाठा



**माजलगाव । प्रतिनिधी**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा परिणाम माजलगाव धरणातील पाणीसाठ्यावर होत आहे. सध्या धरणातून दिवसाकाठी सुमारे ०.५ दलघमी (दशलक्ष घनमीटर) पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याची माहिती धरण प्रशासनाने दिली आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याचा वेगाने होत असलेला अपव्यय प्रशासनासमोर आव्हान ठरत आहे.

सध्या धरणात सुमारे ४० टक्के पाणीसाठा शिल्लक असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यावर भर दिला जात आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बाब म्हणजे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन पूर्ण झाले असून, या आवर्तनामुळे उभी पिके तग धरून असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. धरण प्रशासनाच्या नियोजनानुसार, पाणीसाठा लक्षात घेता आणखी एक आवर्तन देण्याचे नियोजन आहे.

मात्र, तापमानात वाढ कायम राहिल्यास बाष्पीभवनाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**शनिवारची (ता. दोन मे) आकडेवारी**

**पाणीपातळी ४२९.०० मीटर**

**एकूण पाणीसाठा २६८.०० दलघमी**

**उपयुक्त पाणीसाठा १२६.०० दलघमी**

**एकूण टक्केवारी ४०.३८**

वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांनी आधुनिक सिंचन पद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज आहे, तर शनिवारी (ता. दोन) दुपारी दुसरे आवर्तन बंद करण्यात आले असून, १५ मेनंतर उन्हाळी हंगामाचे तिसरे आवर्तन सोडले जाईल. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्यावर भर दिला जात आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा व थकीत पाणीपट्टीचा भरणा करून धरण प्रशासनास सहकार्य करावे. – गणेश झापुगडे, शाखा अभियंता, माजलगाव धरण

▸▸ उर्वरित पान २ वर